# कामगार संघटनातील स्त्रियांचा सहभाग

(ट्रेड युनियनमधील स्त्रियांचा मर्यादित सहभाग, ट्रेड युनियनबाबत त्या दाखवत असलेली उदासीनता हा कामगार चळवळीबरोबरच स्त्री मुक्ती चळवळीसमोरील गंभीर प्रश्न आहे. अनेकदा स्त्रियांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने विचार केला जातो. राका शरन यांनी कानपूरमध्ये झालेल्या स्त्री कामगारांच्या एका पहाणीवरून कामगारसंघटनातील स्त्रियांच्या कमी सहभागाची काही कारणे मांडली आहेत. कामगार संघटना, स्त्री कामगार, स्त्री मुक्ती चळवळीच्या कार्यकर्त्यांना कानपूरमधील पहाणीचे निष्कर्ष उपयुक्त ठरावेत ! मजदूर किसान नीतिच्या १ नोव्हेंबरच्या महिला विशेषांकातील मूळ हिंदी लेख बायजाच्या वाचकांसाठी याच हेतूने सादर करीत आहोत. —संपादक.)

प्राचीन काळापासून स्त्रिया उत्पादन-कार्यात भाग घेत आल्या आहेत. औद्योगिक क्रांतिनंतरच्या काळात तर उत्पादनातील त्यांचा सहभाग वाढू लागला आहे. असे असूनही जगात आणि विशेषत: भारतात स्त्री–कामगार, कामगार चळवळीत फारच कमी प्रमाणात भाग घेताना दिसून येतात. मध्यमवर्गीय महिला राजकीय चळवळीत काही प्रमाणात सहभागी होत असल्या तरी एकंदरीत परिस्थितीचा विचार केला असता स्त्रियांचे प्रमाण याही क्षेत्रात फार कमी आहे. त्यातल्या त्यात ट्रेड-युनियनमध्ये स्त्रियांना आणणे, त्यांचा सहभाग वाढवणे ही एक समस्याच होऊन बसली आहे.

## ट्रेड युनियनपासून स्त्रिया लांब का रहातात ?

कामगार संघटनांपासून स्त्रिया अलिप्त का रहातात ? त्या स्वत:ला राजकारणापासून लांब का ठेवतात ? स्त्रियांची अशी अलिप्त भूमिका असण्याची कारणे कोणती ? ही अलिप्तपणाची भावना किती खोलवर रुजली आहे ? या सर्वांचा शोध घ्यावा लागेल. त्याचबरोबर स्त्रियांना कामगार संघटना हितकारक संघटना वाटतात काय ? कामगार संघटनांबद्दल, स्वरुपाविषयी त्यांचे बरेच गैरसमज असतात ? प्रस्तुत लेखात वरील प्रश्नांची उत्तरे वास्तविक सत्य परिस्थितीवरून देण्याचा प्रयत्न केला आहे. कानपूरमधील २०० महिला कामगारांच्या एका पाहणीच्या आधारावरून ही उत्तरे शोधली आहेत.

कानपूरमधील ट्रेड युनियन चळवळाला बरेच वर्षांचा इतिहास आहे. परंतु पाहणी केलेल्या २०० स्त्री कामगारांपैकी बहुसंख्य स्त्री कामगारांना या संघटनांच्या स्वरुपाविषयी, कार्याविषयी फारशी माहिती नाही. याविषयी जेव्हा त्यांना विचारले तेव्हा त्यांनी आपल्याला युनियनबद्दल काहीही माहिती नसल्याचे सांगितले आणि उलट अशाही शंका उपस्थित केल्या की आम्ही युनियनचे सदस्य बनलो तर यात काय आमचा फायदा होणार आहे ? बऱ्याचशा स्त्रिया या संघटनांच्या सदस्या नाहीत आणि त्यांना सदस्य बनवून घेण्याचे प्रयत्नही संघटनेच्या लोकांनी केलेले नाहीत असे आढळले. २०० स्त्री कामगारांपैकी ७५ स्त्रिया कुठल्या ना कुठल्या संघटनेच्या सदस्या होत्या. आणि यातूनही क्रियाशील स्त्रियांची संख्या तीसचे आसपास होती. उरलेल्या स्त्रिया केवळ सदस्यत्वाची वर्गणी देण्यापुरत्यात धनी होत्या. बाकी कुठल्याही कार्यात त्यांना उत्सुकता नव्हती.

स्त्रियांच्या युनियनबद्दलच्या उदासीनतेमागे सामाजिक, व्यावसायिक, राजकीय अशी अनेक कारणे आहेत. एका कारखान्यातील बहुसंख्य स्त्रियांना कामावरुन काढून टाकण्यात आले होते. त्या स्त्रिया आवेशाने जोरदार प्रतिकार करीत असल्याचे दिसून आले. त्यांची क्रियाशीलता आणि उत्साह पाहून शेवटी कारखान्याचे ते युनिट बंद पडते की काय अशी शंका उपस्थित होऊ लागली. याउलट परिस्थिती टेलिफोन एक्सचेंजमध्ये आढळून आली. तेथे बोनस प्रश्नावरुन बरेच वादंग निर्माण झाले होते. पण तिथल्या तीन-चार युनियन सभा भरवून, बोनस प्रश्नावर चर्चा करून मार्ग काढण्याऐवजी एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करीत होत्या. एकमेकांच्या नेत्यांविरुद्ध गरळ ओकत होत्या. स्त्रिया अर्थातच या आंदोलन-लढ्यापासून लांब राहिल्या आणि त्यांना विचारले असता त्यांनी स्पष्ट सांगितले की अशा या वातावरणात नेत्यांच्या एक-

मेकातील स्पर्धेत सामील झाल्याने आमच्या समस्या थोडयाच सोडविल्या जाणार आहेत ? अशा परिस्थितीत आमच्या पदरात काहीच पडणार नाही उलट तणावच निर्माण होईल. थोडक्यात, कामगार संघटनातील आपाआपसातील भांडणामुळे स्त्रिया युनियनपासून लांब राहिल्या होत्या.

**मॅनेजमेंटचे भय आणि अन्य प्रलोभने !**

मॅनेजमेंटचे युनियनबाबतचे धोरण ही युनियनमधील कामगारांचा सहभाग ठरवत असते. मॅनेजमेंट जर युनियनविरोधी असेल तर कामगार अनेकदा उघड उघड युनियनला पाठिंबा देऊ शकत नाहीत. कारण नोकरीवर गंडांतर येण्याची भीती ही असतेच. अशा वेळी नोकरीत कायम झालेले कामगारच युनियनला सक्रीय पाठिंबा देऊ शकतात. ज्या कारखान्यांची पाहाणी करण्यात आली त्या ठिकाणच्या बऱ्याच स्त्रियांची नोकरी कायम झालेली नव्हती. नोकरी गमावण्याच्या भीतीमुळे त्या युनियनच्या कामात भाग घेत नव्हत्या.

मोर्चे, संप इत्यादीपासून त्या लांब रहात होत्या. त्या ठिकाणी अशाही काही स्त्रिया आढळल्या की त्यांना नोकरीची पर्वा नव्हती. त्या स्त्रिया मात्र निर्भयतेने युनियनच्या कामात भाग घेत होत्या.

टेलिफोन एक्सचेंजमध्ये मात्र स्त्रियांना कायम नोकरी असली तरी युनियनपासून त्या दूर होत्या. कामगार नेत्यांमधील आपसातील वादामुळे त्या लांब रहात होत्याच पण तेथे इतकी प्रलोभने दाखविली जात होती की युनियनला पाठिंबा देण्याची गरजच नाही अशी त्यांची भूमिका झाली होती. यामुळे युनियनच्या 'भानगडी'पासून लांब राहणेच त्यांना जास्त पसंत होते.

**युनियनच्या कामाच्या आड येणारा सामाजिक अडसर !**

युनियन बद्दलच्या स्त्रियांच्या उदासीनतेला सामाजिक कारणही तितकेच प्रबळ आहे. भारतीय कुटुंबव्यवस्थाच अशी आहे की स्त्रियांची नेहमी उपेक्षाच केली जाते. त्यांना नेहमी वडील, भाऊ, पती यांच्या इशाऱ्यावरच नाचावे लागते. रुढींच्या बंधनांनी त्यांना अगदी पिळून काढले आहे. आणि याचा परिणाम होऊनच स्वतंत्र विचार करण्याची त्यांची शक्तीच खुंटली गेली आहे. अशा वेळी ज्या स्त्रियांना वडील, भाऊ, पती यापैकी कोणाचा पाठींबा असेल तरच त्या युनियनच्या कार्यात सहभागी होऊ शकतात. दुसरे असे की स्त्रिया युनियनच्या कार्यात मदत करतात म्हणून त्यांच्यावर असलेली कुटुंबाची जबाबदारी कमी होते असे नाही. घरचा सगळा कामे त्यांना करावी लागतातच. अशा परिस्थितीत पूर्णवेळ सहकार्य देणे त्याना कठीण होते.

**खुर्चीकडे डोळा ठेऊन रोजच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणारा नेता नको!**

या समाजिक, व्यवसायिक कारणांच्या व्यातिरिक्त राजकीय कारणेही तितकीच महत्वाची आहेत. या कारणांमुळे तर त्यांच्या उत्साहावर पूर्णपणे पाणी पडते. अनेक युनियनच्या नेत्यांचा राजकीय पक्षाशी घनिष्ट संबंध असतो. काही नेते आपली खुर्ची संभाळण्यात मग्न होऊन नित्याच्या घटनांकडे, स्थानिक प्रश्नांकडे दुर्लक्ष करतात. यामुळे युनियनचा कार्यकर्तासुद्धा आपले कार्य योग्य तऱ्हेने पार पाडू शकत नाही. अशी ही विस्कळीत संघटना पाहिली की महिला कामगार यात भाग घ्यायला नकार देतात.

अशीच स्थिती जर चालू राहील, पुरुषांचे असेच वर्चस्व राहिल आणि महिला कामगारांचे असेच तिहेरी शोषण (घरात, नोकरीत, संघटनेत) होईल तर मात्र या स्त्रियांचे भवितव्य धोक्यात आल्यावाचून राहाणार नाही. विशेषतः कानपूरच्या परिसरात तर ही स्थिती अत्यंत गंभीर स्वरुपाची आहे. कारण या परिसरातील औद्योगिक क्षेत्र जवळ जवळ गेल्या दशकापासून अशांत बनले आहे. याठिकाणी संघटनेच्या कार्यात पुरुषांप्रमाणे स्त्रियांच्यात गोडी निर्माण करण्याचे कार्य झाले पाहिजे. जेव्हा स्त्रियांना त्यांच्या हक्कांची, फायद्याची जाणीव सुलभरित्या करुन दिली जाईल आणि त्याचबरोबर समाजकारणाचे सोपे धडे त्यांना शिकविले जातील त्याचवेळी कामगार संघटनांबद्दल उत्सुकता आणि आवड स्त्रियांच्यात निर्माण होईल.

यासाठी कामगार संघटनांचे नवीन जोमाने व नव्या पद्धतीने पुनर्संघटन होणे अत्यंत आवश्यक आहे.

अनुवाद : पद्मजा घोरपडे, पुणे.